महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग
राज्यकर सह आयुक्त (प्रशिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
९ वा मजला, जुनी इमारत, वस्तू व सेवा कर भवन,
माझगांव, मुंबई-४०० ०१०.

☎ : ०२२-२३७८६५७१ E-mail ID: trainingsectionmumbai@gmail.com

---

क्र. रासआ (प्रशिक्षण)/मुख्या-१०/राज्यकर निरिक्षक भाग-१ व २ विभाप-२०२५/ब-६११ मुंबई दिनांक - २८/१२/२०२५

## परिपत्रक

विषयः- दि. २९/१२/२०२५ ते दि. ३१/१२/२०२५ या कालावधीत नियोजित असलेली राज्यकर निरीक्षक भाग-०१ व भाग-०२ विभागीय परीक्षा २०२५ पुढे ढकलण्याबाबत...

संदर्भ :- १) रासआ(प्रशिक्षण)/मुख्या-१०/राज्यकर निरिक्षक भाग-१ व २ विभाप-२०२५/ब-५३६, मुंबई दि. ३१.१०.२०२५,

२) रासआ(प्रशिक्षण)/मुख्या-१०/राज्यकर निरिक्षक भाग-१ व २ विभाप-२०२५/ब-५७५, मुंबई दि. ०४.१२.२०२५,

३) रासआ(प्रशिक्षण)/मुख्या-१०/राज्यकर निरिक्षक भाग-१ व २ विभाप-२०२५/ब-५८५, मुंबई दि. ११/१२/२०२५,

४) मा. महापालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे बृहन्मुंबई महानगर पालिका निवडणुक कर्तव्याबाबतचे आदेश व राज्यातील इतर २८ महानगर पालिकांच्या निवडणूका.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये राज्यकर निरिक्षक भाग-१ व भाग-२ विभागीय परिक्षा -२०२५ आयोजित करण्याबाबतचे परिपत्रक विभागाच्या संकेतस्थळावर दि. ३१.१०.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यानुसार दि.२९.१२.२०२५, ३०.१२.२०२५ व दि. ३१.१२.२०२५ या कालावधीत मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर व छत्रपती संभाजी नगर या केंद्रांवर परीक्षा नियोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील बृहन्मुंबई महानगर पालिका व इतर २८ महानगर पालिकांच्या निवडणूका दि. १५/०१/२०२६ रोजी पार पडणार आहेत. त्यानुषंगाने वस्तू व सेवा कर विभागातील कर सहायक व राज्यकर निरीक्षक असलेले परीक्षार्थी, परीक्षेसाठी पर्यवेक्षक व समवेक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी तसेच प्रशिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी यांना दि. ३०/१२/२०२५ व दि. ३१/१२/२०२५ या परीक्षा कालावधीत निवडणुकीच्या पहिल्या प्रशिक्षणास उपस्थित राहण्याचे आदेश प्राप्त झालेले आहेत / होत आहेत.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता निवडणुक कर्तव्य हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याने, दि. २९/१२/२०२५ ते दि. ३१/१२/२०२५ या कालावधीत नियोजित असलेली राज्यकर निरीक्षक भाग-०१ व भाग-०२ विभागीय परीक्षा २०२५ पुढे ढकलण्यात येत आहे.

परीक्षेच्या पुढील तारखा परीक्षा केंद्रांच्या उपलब्धतेनुसार यथावकाश जाहीर करण्यात येतील.

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

Chavan
24/12/25

सुनिल चव्हाण,
राज्यकर सह आयुक्त (प्रशिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहितीसाठी सविनय सादर** :

१. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. सर्व मा. क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर/रवाना** :

१. सर्व राज्यकर सह आयुक्त, सर्व राज्यकर उप आयुक्त (प्रशासन), सर्व सहायक राज्यकर आयुक्त (प्रशासन) यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्याची नोंद आपल्या अभिलेखावर ठेवण्यात यावी.
२. आस्थापना अधिकारी, राज्यकर आयुक्त व अपर राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,
३. प्रबंधक, महाराष्ट्र राज्यकर न्यायाधिकरण, मुंबई,
४. राज्यकर उप आयुक्त (जनसंपर्क), सुरक्षा अधिकारी, माझगाव कार्यालय व बांद्रा कार्यालय, मुंबई.